क्रमांक : ११२४५ /म.वि.स./ब
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ७ जुलै,२०२३

**:: प रि प त्र क ::**

**विषय : मंत्रीपरिषदेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या मा.सदस्यांची नावे प्रश्न सूचनेतून वगळण्याबाबत...**

निदेशानुसार सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, रविवार, दिनांक २ जून,२०२३ रोजी मंत्री परिषदेमध्ये पुढील विधानसभा सदस्य श्री. अजित अनंतराव पवार, उप मुख्यमंत्री, श्री.छगन चंद्रकांत भुजबळ, श्री.दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील, श्री.हसन मियालाल मुश्रीफ, श्री.धनंजय पंडितराव मुंडे, श्री.धर्मराव भगवंतराव आत्राम, श्रीमती आदिती वरदा सुनिल तटकरे, श्री.संजय बाबुराव बनसोडे, श्री.अनिल भाईदास पाटील, यांची मंत्री म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांच्या तारांकित/अतारांकित प्रश्नांबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. उपरोक्त सदस्यांनी केवळ त्यांच्या स्वत:च्या नावाने दिलेले प्रश्न व्यपगत समजण्यात येतील.
२. इतर सदस्यांच्या प्रश्न सूचनेबरोबर नाव जोडण्यात आले असेल तर सदर प्रश्नांमधून त्यांचे नाव वगळण्यात येईल.
३. जर प्रश्न सूचनेवर उक्त सदस्यांचे नाव प्रथम क्रमांकावर असेल व त्यापुढे अन्य सदस्यांची नावे असतील तर त्यांचे नाव वगळून तो प्रश्न त्यापुढील सदस्यांच्या नावे दर्शविण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे प्रश्न व्यपगत वा नावे वगळण्याची कार्यवाही या सचिवालयाकडून करण्यात येईल, मात्र मंत्रीमंडळ विस्तार होण्यापूर्वी मंत्रालयीन विभागांकडे पाठविण्यात आलेल्या प्रश्नात व त्यांच्या उत्तरात या नावांचा समावेश राहणार नाही, याची दक्षता मंत्रालयीन विभागाने देखील घ्यावी.

**(सीमा तांबे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति :**

१. सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई-४०० ०३२. (प्रत्येकी २ प्रती)
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी २ प्रती)
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी २ प्रती)
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी २ प्रती)